**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**

**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**

**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**

फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्स नं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२६/2840812 दि. १४-०५-२०२६

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
४. कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था, पुणे.
५. कुलसचिव, सर्व अकृर्षि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये, **पुणे, अहिल्यानगर नाशिक** .

**विषय:- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.**

संदर्भ:- मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उशिस/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई.६८४,दि. १३ मे,२०२६

उपरोक्त विषयाबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र दि. १३-०५-२०२६ च्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. (सोबत प्रत जोडली आहे)

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ ( इ. 12 वी) चा निकाल जाहिर झाला असुन सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/ होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (Other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे

अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सुचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील. असे मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या पत्रात नमूद केले आहे.

त्यानुषंगाने विभागातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत आपल्यास्तरावरुन उचित कार्यवाही करावी.

**सोबत:** संदर्भिय पत्र.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 15-05-2026
11:04:10

**(डॉ.अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-१६

**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई. /1684 दि. मे.२०२६ 13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ ( इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रतः-१. मा.स्वीय सहाय्यक मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई